# ‘ग्रंथाली’ची ३०० इ-बुक आयपॉडवर प्रकाशित होणार

**प्रतिनिधी**

शिकागो येथे २२, २३, २४ जुलै रोजी होणाऱ्या बी.एम.एम. अधिवेशनात ग्रंथाली व बुकगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने ३०० पुस्तके ई-बुक रूपात प्रसिद्ध होत आहेत. चार नवीन पुस्तकांचे प्रकाशनही प्रसिद्ध होणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक अधिवेशनासाठी ग्रंथालीच्या रुची मासिकाचा विशेषांक प्रसिद्ध केला जातो. त्याचे प्रकाशन यावेळी करण्यात येणार आहे.

विवेकानंदांनी भारतीयत्वाची मोहोर उमटवली ते हे ठिकाण. आज महाराष्ट्रातून तिथे पोहोचलेल्यांनी व येथे महाराष्ट्रात असलेल्यांनी काय ठसा उमटवला हे पाहताना, महाराष्ट्र स्थापनेची पहिली २५ वर्षे मनोहारी असली तरी पुढची मात्र आहे मनोहर तरी अशी आहेत. त्याचा आढावा विशेषांकातील महाराष्ट्र २०२० या विभागात घेतला असल्याचे ग्रंथालीतर्फे सुदेश हिंगलासपूरकर यांनी सांगितले. अमेरिकेत गेली ३० वर्षे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन भरते.

विशेषतः अमेरिकेतून दर दोन वर्षांनी होणाऱ्या या अधिवेशनास मोठ्या संख्येने मराठी समुदाय जमतो. या अधिवेशनात प्रथम पुस्तके नेली ती ग्रंथालीने.

## चार नवीन पुस्तकांचे प्रकाशन



१९९३ साली बाल्टिमोर येथील अधिवेशनात ग्रंथालीतर्फे सुदेश हिंगलासपूरकर सहभागी झाले. तेव्हापासून सातत्याने २० वर्षे ग्रंथाली सहभागी होत असल्याचे ग्रंथालीतर्फे सांगण्यात आले.

विद्या हर्डिकर-सप्रे यांचे ‘संवादने’, प्रगती कोळगे यांचे ‘मनातल्या वावटळी’, स्मिता भागवत यांची ‘तेजस्विनी’ व ‘परक्या भूमीवर घर’ आणि गजानन सबनीस यांच्या ‘ही आपलीच माणसं’ या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद आदी पुस्तके प्रकाशित होणार आहेत. आपले वाचनालय आपल्या सोबत या योजनेत खरेदी करणाऱ्या ग्राहकाला ग्रंथालीची ३०० ई-बुक बुकगंगामार्फत आयपॅडवर लोड करून दिली जातील.

शिवाय, त्या ग्राहकाने सुचविलेल्या महाराष्ट्रातील एका व्यक्ती/संस्थेस ग्रंथालीतर्फे २५० पुस्तकांचा संच भेट दिली जाईल, अशी माहिती हिंगलासपूरकर यांनी दिली. ■